**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५५/२०१७-१८/ 46 दिनांक: 14/03/2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ५५ /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री तानाजी कृष्णा माने<br>मु.पो. साखराळे(माने मळा) ता. जत जि. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग इस्लामपूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इस्लामपूर-एक | |

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

5/4/2018

१. तक्रारदार श्री तानाजी कृष्णा माने , मु.पो. साखराळे (माने मळा) ता. वाळवा जि. सांगली यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंप वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक २६.१२.२०१७ रोजी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२. तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेतीसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनाक ०७.१२.२०१७ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३. तक्रारदार यांनी वरील प्रमाणे दि. २९.०१.२०१६ रोजी पावती क्र. ४६८५१५१ रक्कम रु. २५५०/- भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदाराचे नाव इस्लामपूर एक उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

४. उपविभाग इस्लामपूर अतंर्गत असणारी शेतीसाठी वीज पुरवठा देणे आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील सदर ग्राहकाचे नाव प्रतिक्षा यादीमध्ये १७० व्या क्रमांकास आहे.

५. या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०५.०३.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. उपकार्यकारी अभियंता श्री प्रदिप सुर्वेसे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

६. या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

७. तक्रारदारांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. नविन उपकेंद्र उभारणेची गरज नाही. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

८. विशिष्ट मुदतीत वीज पुरवठा देणे कायद्याने वि.प. यांचेवर बंधनकारक आहे. तसे न केल्यास विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) मध्ये दंडात्मक तरतूद केली आहे. कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेतीसाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. २०.०४.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

5/3/18

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.